N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण **P.S.(ठाणे):** सिल्लोड सिटी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0062 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/03/2025 20:21

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 18/03/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 18/03/2025
**Time From (वेळेपासून):** 12:11 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:26 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 18/03/2025 **Time (वेळ):** 19:53 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 027
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/03/2025 19:53 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जुगनु ज्युस सेन्टरमध्येसिल्लोड, पंचायत समिती कार्यालय समोर,सिल्लोड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): कैलास प्रभु बोराडे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1991

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | हाळदा,सिल्लोड,सिल्लोड सिटी,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | हाळदा,सिल्लोड,सिल्लोड सिटी,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9322650162

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अमोल श्रीमंत हजारे | | | 1. छत्रपती शिवाजीनगर,सिल्लोड, सिल्लोड सिटी,औरंगाबाद ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या 24 नोटा | 12,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

12,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी खालील सही करणार कैलास प्रभु बोराडे, वय 34 वर्षे, व्यवसाय - शेती, रा.हळदा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर मो.क्र. 9322650162.

दिनांक 18/03/2025 रोजी समक्षहजर राहून फिर्याद देतो की, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील पोलीस निरीक्षक श्री.शांतीलाल चव्हाण यांचे वदोन पंचासमक्ष सिल्लोड शहर येथे एका सुरक्षित ठिकाणी दिनांक 17/03/2025 रोजी स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार दिली ती पुढील प्रमाणे,

मी कैलास प्रभु बोराडे वय 34 वर्षे, व्यवसाय - शेती हळदा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर मो.क्र. 9322650162.

आज दि.17/03/2025 रोजी सिल्लोड शहर येथे एका सुरक्षीत ठिकाणी हजर येवुन पो.नि.शांतीलाल चव्हाण लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर व दोन शासकिय पंचासमक्ष स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार देतो की, मी वरिल प्रमाणे असुन शेती व्यवसाय करुन माझा व कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहे. मौजे हळदा शिवार ता. सिल्लोड येथे शेत गट क्र.115 मध्ये 1 हेक्टर 92 आर आमची शेत जमीन असुन ती माझे वडील प्रभु सांडू बोराडे यांचे नावे आहे. सदर शेत जमीनीत सन 2022-23 वर्षात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तीक लाभाच्या योजनेत दिनांक 18/07/2022 रोजी प्रशासकिय मान्यता क्र.127728 अन्वये .सिंचन विहीर मंजुर झालेली आहे. विहीर मंजुर झाल्यानंतर टप्या-टप्याने विहीरीचे काम करण्यात आले असुन विहिरीचे सर्व काम पुर्ण झाले आहे. त्यामुळे हजेरी मष्टर तयार करुन सिंचन विहीरीचे शेवटचे बिल 1,26,000/-रुपये मंजुरी करिता फाईल तयार केली होती.

दिनांक 12/03/2025 रोजी मी श्री.अमोल हजारे (टेक्नीकल असीस्टंट पंचायत समिती सिल्लोड) यांची सिल्लोड पंचायत समिती कार्यालय येथे भेट घेवुन माझे विहीरीचे बिल 1,26,000/-रुपये ऑनलाईन करुन मंजुर करण्याबाबत त्यांना फाईल दाखवुन विनंती केली त्यावर श्री अमोल हजारे मला म्हणाले की, त्यावर ग्रामसेवक यांची स्वाक्षरी झाल्यावर फाईल घेवुन माझ्याकडे ये त्यानंतर तुला फाईल ऑनलाईन करण्यासाठी व तुझे 1,26,000/-रुपयाचे बिल मंजुर करण्यासाठी 12,000/-रुपये दयावे लागतील त्यानंतरच बिल मंजुर होईल मी त्यांना एवढी रक्कम आज माझ्याकडे नाही असे सांगितले असता श्री.अमोल हजारे म्हणाले की, मी आता गावाकडे जाणार आहे दि.17/03/2025 रोजी येवुन मला भेट त्यावेळी आपण तुझे फाईल बघु. तरी मला श्री.अमोल हजारे यांना लाच देण्याची ईच्छा नसतांनाही मी नाईलाजाने त्यांना हो म्हणलो आहे.

तरी मी दिनांक 17/03/2025 रोजी पंचायत समिती सिल्लोड कार्यालय येथे श्री.अमोल हजारे (टेक्नीकल असीस्टंट पंचायत समिती सिल्लोड) यांची भेट घेवुन त्यांना आमचे शेत गट क्र. 115 मधील मंजुर वै.सिंचन विहीरीचे शेवटच्या टप्यातील बिल 1,26,000/-रुपये ऑनलाईन करुन मंजुर करावे या करिता विनंती करणार आहे. त्यावेळी श्री.अमोल हजारे (टेक्नीकल असीस्टंट पंचायत समिती सिल्लोड) यांनी सदर कामासाठी माझ्याकडे 12,000/-रुपये लाचेची मागणी करुन मागणी केलेली लाचेची रक्कम स्वत: अगर इतरां मार्फत स्विकारल्यास त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी ही विनंती आहे. माझा व श्री.अमोल हजारे (टेक्नीकल असीस्टंट पंचायत समिती सिल्लोड) यांचा वैयक्तीक देण्या-घेण्याचा अगर उसणवारीचा कसलाही व्यवहार नाही. माझी वर नमुद तक्रार मी स्वहस्ताक्षरात लिहीली असुन वाचुन पाहिली ती बरोबर व खरी आहे.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्री.शांतीलाल चव्हाण यांनी बोलविलेले शासकिय पंच क्र.1 श्री. किरण अशोक वाकेकर,वय 33 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-लिपीक टंकलेखक, अस्थापना (अग्नीशमन विभाग पदमपुरा), महानगर पालीका छत्रपती संभाजीनगर, रा.घर नं.15, राजनगर, हर्सुल, ता.जि.छत्रपती संभाजीनगर व पंच क्र.2. श्री.प्रशांत प्रकाश बोर्डे, वय 22 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-स्वच्छता निरीक्षक, अस्थापना (घान कचरा विभाग), महानगर पालीका छत्रपती संभाजीनगररा.एकतानगर, पंचशिल चौक, छत्रपती संभाजीनगर असा आमचा

ओळख परिचय करुन दिला. त्यानंतर मी थोडक्यात तोंडी तक्रार पंच व पो.नि.श्री. शांतीलाल चव्हाण यांना सांगुन माझी स्वहस्ताक्षरात लिहलेली तक्रार दिली त्यावर मी दोन्ही पंचानी व पो.नि.श्री. शांतीलाल चव्हाण साहेब यांनी तोंडी सांगितलेली तक्रार व लेखी तक्रार सारखीच असल्याने त्यावर त्यांनी मी स्वाक्षरी केल्या आहेत.
माझ्या तक्रारीचे अनुषंगाने पो.नि.श्री.शांतीलाल चव्हाण व शासकिय पंच असे सर्वानुमते श्री.अमोल हजारे (टेक्नीकल असीस्टंट पंचायत समिती सिल्लोड)यांची दिनांक 17/03/2025 रोजी पंचायत समिती सिल्लोड कार्यालय येथे जावुन लाच मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतरपो.नि.श्री.शांतीलाल चव्हाण, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी मला श्री.अमोल हजारे (टेक्नीकल असीस्टंट पंचायत समिती सिल्लोड) यांना फोन लावुन ते कोठे आहेत या बाबत विचार असे सांगितल्याने मी माझे मोबाईलवरुन श्री. अमोल हजारे यांचे फोन क्र. 9850565478 वर दुपारी दोन वाजेच्या सुमारास फोन करुन विचारले असता श्री. अमोल हजारे मला म्हणाले की मी आणखी गावीच आहे तु मला उदया (दि.18/03/2025) पंचायत समिती कार्यालयात येवुन भेट असे सांगितले त्यावर मी सदरची बाब पो.नि. श्री.शांतीलाल चव्हाण व सापळा पथक यांना सांगितली त्यामुळे पो.नि. चव्हाण साहेब यांनी सार्वानुमते अमोल हजारे यांची लाच मागणी पडताळणी कारवाई दिनांक 18/03/2025 रोजी करण्याचे ठरले.
दिनांक 18/03/2025 रोजी पो.नि.शांतीलाल चव्हाण, ला.प्र.वि. छ.संभाजीनगर, सापळा पथक व शासकिय पंच असे सकाळी 10.30 वाजेच्या सुमारास सिल्लोड शहरात एका सुरक्षीत ठिकाणी आले. सदर वेळी मी ही सुरक्षीत ठिकाणी पोहचलोतेथे माझ्या दि.17/03/2025 रोजीच्या तक्रारीचे अनुषंगाने पो.नि.श्री.शांतीलाल चव्हाण व शासकिय पंच असे सर्वानुमते श्री.अमोल हजारे (टेक्नीकल असीस्टंट पंचायत समिती सिल्लोड)यांची दिनांक 18/03/2025 रोजी पंचायत समिती सिल्लोड कार्यालय येथे जावुन लाच मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यावेळीपो.नि.श्री.शांतीलाल चव्हाण यांनी मला व पंचाना लाचमागणी पडताळणी मध्ये सोनी कंपनीचा डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर वापरण्यात येणार असल्याचे सांगुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती दिली तसेच त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पंचासमक्ष डीजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन सदर मेमरी कार्डमध्ये यापुर्वीचे काही संभाषण रेकॉर्ड नसल्याचे दाखवुन दिले. त्यानंतर माझ्याकडे व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन देवुनश्री.अमोल हजारे (टेक्नीकल असीस्टंट) यांना भेटण्यासाठी पंच क्र. 1 श्री.किरण अशोक वाकेकरयांचेसह माझे मो.सा. क्र.एमएच 20 सि.एफ. 1232वर11.56 वाजता रवाना केले.आम्ही पंचायत समिती कार्यालय सिल्लोडयेथे गेलो तेथे गेल्यानंतर मी श्री.अमोल हजारे (टेक्नीकल असीस्टंट) यांना मी माझे मोबाईल वरुन संपर्क करुन पंचायत समिती कार्यालय येथे आलो असल्याचे सांगितले त्यावर श्री. अमोल हजारे हे तुम्ही थोडे थांबा मी येतो कार्यालयात असे म्हणाले थोडया वेळानंतर श्री.अमोल हजारे (टेक्नीकल असीस्टंट) हे पंचायत समिती कार्यालयात आले तेथे माझी व त्यांची भेट झाली त्यावेळी मी श्री.अमोल हजारे यांना माझे सिंचन विहीरीची शेवटचे मस्टर 1,26,000/-रुपये बिलाची फाईल दिली सदर फाईलवर त्यांनी त्यांचे स्वाक्षरी केल्या त्यानंतर मी श्री.अमोल हजारे यांना म्हणालो की, तेवढ काम करुन टाका त्यावर श्री.अमोल हजारे म्हणाले की, हो आता काही राहिले नाही मी ऑनलाईन करुन टाकतो बारा (12) देण पडण त्यावर मी त्यांना म्हणालो की, बारा (12) जास्त होता साहेब दोन हजार कमी करा दहा हजार त्यावर श्री.अमोल हजारे म्हणाले की, नाही बारा (12) देण पडण असे म्हणुन माझ्याकडे 12,000/-रुपये लाचेची मागणी केली त्यानंतर मी पंचासह सुरक्षीत ठिकाणी परत आलो. तेथे सापळा अधिकारी पो.नि.श्री.शांतीलाल चव्हाण यांनी विचारले वरुन पंच क्र.1 यांनी व मी घडलेली सर्व हकिगत सांगितली त्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी पंचासमक्ष डीजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले त्यावरुन श्री.अमोल हजारे (टेक्नीकल असीस्टंट) यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाल्याने पो.नि.शांतीलाल चव्हाण व पंच सर्वानुमते लगेचच दिनांक 18/03/2025 रोजी पंचायत समिती कार्यालय सिल्लोड, ता.सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर येथे लाचेचा सापळा आयोजीत करण्यात आला.
सापळा कारवाईच्या वेळी श्री.अमोल हजारे (टेक्नीकल असीस्टंट) यांना लाच म्हणुन देण्याकरिता 12,000/-रुपये बाबत पो.नि. चव्हाण साहेब यांनी माझ्याकडे विचारणा केली असता मी 12,000/-रुपये सोबत आणले आहे असे सांगुण सदर रक्कम 12,000/-रुपये हजर केली ज्यात 500/-रुपये दराच्या भारतीय चलनातील24 नोटा होत्या. त्यानंतर माझी अंगझडती घेवुन आवश्यक तेवढया वस्तु माझ्या जवळ देण्यात आल्या.मी हजर केलेल्या 12,000/-रुपयांच्या नोटांना अॅन्थ्रोसिन पावडर लावुन माझ्याशर्टच्या समोरिल डाव्या बाजूच्या खिश्यात ठेवण्यात आल्या. त्यानंतर माझ्याकडे व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देवुन मला व पंच क्रमांक क्र.1 श्री.किरण वाकेकर असे आम्हाला सुरक्षीत ठिकाणावरुन 12.11 वा.रवाना केले. त्यानंतर मी पंच क्र. 1 श्री.किरण वाकेकर असे माझे मोटार सायकलवर बसुनपंचायत समिती कार्यालय, सिल्लोड, ता.सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर येथे गेलो तेथे गेल्यानंतर मी श्री.अमोल हजारे यांचे फोनवर फोन करुन मी कार्यालयात आलो असल्याचे सांगितले. थोडयावेळानंतर श्री.अमोल हजारे यांचा फोन माझ्या मोबाईल क्रमांकावर आला ते म्हणाले की, मी

कार्यालय गेट समोरच्या ज्युसच्या दुकानावर आहे तुम्ही समोर या असे म्हणाले त्यावर मी पंच क्र.1 यांचेसह सदर ज्युसच्या दुकाणावर गेलो व श्री.अमोल हजारे यांना प्रत्यक्ष भेटलो त्यावळी पंच क्र.1 यांचे समक्ष श्री.अमोल हजारे मला म्हणाले की, मला पटकन पैसे देवुन टाका असे म्हणाल्याने त्यावर मी त्यांना म्हणालो की, माझे काम होईन का सर त्यावर श्री.अमोल हजारे म्हणाले की, मार्च एंड पर्यंत ऑनलाईन होइल फाईल, आम्हाला पण वाटत पटकन व्हाव व तुम्हाला पैसे मिळावे म्हणुन त्यानंतर मी माझ्या शर्टच्या समोरील डाव्या बाजूच्या खिश्यातुन लाचेची रक्कम 12,000/-रुपये उजव्या हाताने काढून श्री.अमोल हजारे (टेक्नीकल असीस्टंट) यांचे समोर धरली असता त्यांनी पंच क्र. 1 यांचे समक्ष सदरची लाचेची रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्वत: स्विकारुन त्यांचे डाव्या हातात घेतली व डाव्या हाताने नेसणीस असलेल्या जिन्स पॅन्टच्या मागील डाव्या बाजुच्या खिश्यामध्ये ठेवली. त्यानंतर मी सापळा पथकास दिसेल अश्या रितीने 12.26 वाजता पुर्वनियोजीत ईशारा केला असता सापळा पथकातील अधिकारी, कर्मचारी व पंच असे घटनास्थळी हजर आले व पोलीस निरीक्षक श्री.शांतीलाल चव्हाण यांनी लोकसेवक श्री.अमोल हजारे (टेक्नीकल असीस्टंट)यांना जागेवरच लाच रक्कमेसह ताब्यात घेतले.ताब्यात घेतल्यानंतर त्यांना आपला व सापळा पथकाचा परिचय देवुन त्यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.अमोल श्रीमंत हजारे,वय 37 वर्ष, व्यवसाय-नोकरी पद-टेक्नीकल असीस्टंट कंत्राटी, पंचायत समिती सिल्लोड, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर रा. छ.शिवाजीनगर, देशमुख यांचे घरी किरायाने सिल्लोड, ता.सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर असे सांगितले.त्यानंतर पो.नि.श्री.शांतीलाल चव्हाण यांनी श्री.अमोल हजारे यांचेकडे स्विकारलेल्या लाचेच्या रक्कमे बाबत विचारणा केली असता श्री.अमोल हजारे (टेक्नीकल असीस्टंट) यांनी दोन्ही पंचासमक्ष त्यांचे खिश्यातुन12, 000/-रुपये लाचेची रक्कम काढुन पंच क्र.2 श्री.प्रशांत बोर्डे यांचेकडे दिलीआहे.त्यानंतर पो.नि. चव्हाण साहेब, पंच, सापळा पथक लोकसेवकश्री.अमोल हजारे व मी असे तेथुन निघुन सिल्लोड ग्रामीण पोलीस स्टेशन येथे आलो. सदर ठिकाणी घटनेबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी दिनांक 18/03/2025 रोजी लोकसेवक श्री.अमोल श्रीमंत हजारे,वय 37 वर्ष, व्यवसाय-नोकरी पद-टेक्नीकल असीस्टंट कंत्राटी, पंचायत समिती सिल्लोड, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी माझ्याकडे आमचे शेत गट क्र. 115 मध्ये सन 2022-23 वर्षात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तीक लाभाच्या योजनेत मंजुर सिंचन विहीरीच्या कामाचे शेवटचे बिल 1,26,000/-रुपये ऑनलाईन करुन मंजुर करुन देण्यासाठी म्हणुन 12,000/-रुपयाची लाचेची मागणी करुन सदरील लाच रक्कम दिनांक 18/03/2025 रोजी 12.26 वाजता पंचायत समिती कार्यालय सिल्लोड समोरील जुगणु ज्युस सेंटर मध्ये ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर येथेलोकसेवक श्री.अमोल श्रीमंत हजारेयांनी पंचसाक्षीदारासमक्ष माझ्याकडुन स्वत: स्विकारली आहे. करिता लोकसेवक श्री.अमोल श्रीमंत हजारे,वय 37 वर्ष, व्यवसाय-नोकरी पद-टेक्नीकल असीस्टंट कंत्राटी, पंचायत समिती सिल्लोड, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे. माझी वरिल फिर्याद माझे सांगणे प्रमाणे माझे समक्ष मराठीत संगणकावर टंकलिखीत करण्यात आली असुन ती मी वाचुन पाहिली ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

MAYANK MADHAV(SP (Superintendant of Police)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
[signature] 18/3/2025

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

[signature]
ठाणे अमलदार
पो.स्टे. [illegible]

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची सवाक्षरी)

**Name** (नाव): MAYANK MADHAV
**Rank**(पद): SP (Superintendant o
**No.**(सं.):